# हिंसा आणि शोषणाच्या प्रकरणांमध्ये तपास आणि आवश्यक सेवा उपलब्ध करून देण्यासंबंधातील आरोग्य कार्यकर्त्यांची भूमिका

## हिंसा किंवा शोषण ओळखणं

- शोषण निदर्शनास आणणारी लक्षणं आणि चिन्हं पाहा.
- संवेदनशीलपणे तपासणी करा.
- पीडित व्यक्तीला गोपनीयता राखण्याची खात्री द्या. तिच्या सुरक्षिततेला प्राधान्य द्या.

## भावनिक सहाय्य

- लक्षपूर्वक ऐका
- पीडित व्यक्तीवर विश्वास ठेवा.
- त्या स्त्रीच्या अनुभवाविषयी शंका घेऊ नका.
- ती एकटी नाही, तुम्ही तिच्या सोबत आहात हा विश्वास तिला द्या.
- हिंसा हा तिचा दोष नसल्याचे तिला सांगा

## माहिती आणि संदर्भ सेवा

- हिंसा हा कायद्याने गुन्हा असल्याची माहिती पीडित स्त्रीला द्या.
- याबाबत पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदवण्याचं महत्व सांगा. त्याबरोबरच हेही सांगा की, पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदवायची आहे की नाही हा तिचा स्वतःचा निर्णय आहे, तक्रार नोंदवणं बंधनकारक नाही.
- पीडित स्त्रीबरोबर तिच्या सुरक्षिततेविषयी संवाद साधा...
- यापुढील मदतीच्या दृष्टीने (निवारा, सल्ला, कायदेशीर मदत) हिंसाग्रस्त स्त्रीला इतर संस्थांची मदत मिळवून द्या.

## उपचारांसाठी सहाय्य

- हिंसेबाबतची सविस्तर माहिती (हिस्ट्री) घ्या.
- हिंसेशी संबंधित सध्याच्या आणि आधी घडून गेलेल्या घटना समजून घ्या.
- हिंसाग्रस्त स्त्रीला न्याय वैद्यकीय शास्त्र (फोरेन्सिक) तपासणीचे महत्व आणि पद्धतीबद्दल सांगा. त्या स्त्रीची संमती घेऊनच तपासणी करा.
- पीडित स्त्रीला झालेल्या सर्व प्रकारच्या जखमा तसेच इतर समस्यांवर त्वरित उपचार करा.

## दस्तऐवजीकरण

- न्याय वैद्यकीय स्वरुपाच्या केसची नोंद करा. एम. एल. सी. रजिस्टर आणि केस पेपरमध्ये तशा नोंदी करा.
- लैंगिक हिंसेच्या प्रकरणांमध्ये न्याय वैद्यक शास्त्रीय (फोरेन्सिक) पुरावे एकत्रित करून विवरण नोंदवा.
- जर कौटुंबिक हिंसाचाराची केस असेल तर कौटुंबिक घटना रिपोर्ट नोंदवा.


UNFPA
संयुक्त राष्ट्र जनसंख्या कोष
सार्वजनिक आरोग्य विभाग
NATIONAL HEALTH MISSION, MAHARASHTRA
NHM
राष्ट्रीय आरोग्य अभियान
महाराष्ट्र
Cehat

# हिंसाग्रस्त महिला आणि मुली ओळखण्यासाठी चिन्हं आणि लक्षणं

## स्त्री रोग / प्रसूतीसंबंधित लक्षणे

- सततचे गरोदरपण
- वारंवार मुलीचा जन्म होणे
- अवैद्यकीय गर्भपात
- वैद्यकीय गर्भपात (एम. टी. पी.)
- नसबंदीची शस्त्रक्रिया उलटवणे
- कुमारी माता/विधवा गर्भवती
- दीर्घकाळ अंगावरून पांढरं जाणे
- प्रसूतीनंतरचा मानसिक ताण
- ओठ, स्तन आणि इतर लैंगिक अवयवांवर जखमांच्या खुणा
- वार वेगळी होणे आणि रक्त वाहणे
- ओटीपोटात दुखणे
- वंध्यत्व
- एकाच वेळी दोनपेक्षा जास्त मुलं होणे
- सर्व गर्भवती स्त्रिया
- गरोदरपणात पडल्याची तक्रार
- पीडित स्त्री मारहाणीबाबत माहिती देत असेल तर

## नेत्र रोग संबंधी लक्षणे

- डोळ्यांना जखम
- डोळ्यांना खरचटणे

## वैद्यकीय तपासणीतून समोर आलेली लक्षणे

- विष घेतल्याची माहिती
- दम लागणे
- वारंवार बेशुद्ध पडणे
- अंगावर सूज/वेदना
- वारंवार आरोग्य समस्या निर्माण होणे, परंतु रिपोर्ट मात्र सामान्य (नॉर्मल) येणे
- दीर्घकाळ अनिमियाची लक्षणे
- सततची अंगदुखी/डोकेदुखी किंवा कंबरदुखीची तक्रार
- अचानक वजन कमी होणे
- क्षयरोगाची लक्षणे
- अस्पष्ट कारणांनी येणारा ताप
- झटके येणे
- वारंवार जुलाब लागणे (आय. बी. एस.)
- भूक कमी होणे

## अस्थि रोगसंबंधी

- कोणतेही हाड मोडणे
- घरात कशाही प्रकारे पडणे किंवा जखम होणे
- किरकोळ लचक भरणे
- मांसपेशी/सांध्यांना जखम होणे (लीगामेंट इन्जुरी)
- जखमेमुळे त्वचेच्या खाली रक्त साकळणे/अंतर्गत जखमा
- दीर्घकाळापासून मान, खांदे आणि पाठ दुखणे

## आकस्मिक

- मारहाण/इजा करणे
- विष घेणे/आत्महत्येचा प्रयत्न
- भाजणे/जळणे
- हाड मोडणे (फ्रॅक्चर)
- पडणे
- गर्भावस्थेत पडणे किंवा इजा होणे
- स्त्रियांमध्ये जखम/खरचटल्याची तक्रार

## मानसिक आजारासंबंधित लक्षणे

- नैराश्य (डिप्रेशन)
- निद्रानाश
- आत्महत्येचा प्रयत्न
- चिंता/तणाव
- स्वत:ला इजा करण्याची प्रवृत्ती
- पुन्हा पुन्हा तेच विचार किंवा कृती करण्याची प्रवृत्ती (ऑब्सेसिव्ह कम्पल्सिव्ह डीसऑर्डर)
- खाण्या-पिण्याच्या सवयींमुळे झालेले आजार
- अंमली पदार्थांचे सेवन
- वारंवार आरोग्याच्या समस्या

## त्वचा संबंधित लक्षणे

- लिंग सांसर्गिक आजार
- प्रजनन आरोग्याचे आजार
- एच. आय. व्ही पॉझीटिव्ह आणि एड्सचे रुग्ण
- वारंवार अलर्जी येणे
- दीर्घकाळ त्वचेचे आजार
- मान, मांडी, कंबर किंवा कपाळावर अलर्जीमुळे लाल होणे
- बुरशीजन्य संसर्ग
- एक्जीमा

## मुलांमधील वैद्यकीय तपासणीद्वारे समोर आलेली लक्षणे

- लहान मुलांचे शोषण
- लैंगिक शोषण
- एकाग्रता कमी होणे
- दीर्घकाळ पोटदुखी
- वारंवार डोकेदुखीची तक्रार
- खरचटणे/काळे-निळे पडणे
- किशोरावस्थेच्या आधीच अंगावरून पांढरं जाणे
- लघवीमध्ये जळजळ होणे
- मुलाला अंगावर दुध पिण्यात अडचण येणे
- बिछाना ओला करणे
- शरीरात रक्ताची कमतरता
- रात्री वारंवार भितीदायक स्वप्न पडणे

## नाक, कान, घसा याविषयी

- कानाचा पडदा फाटणे
- विविध प्रकारच्या जखमा, हाडं मोडणे
- जबड्याचे स्नायू आखडणे / दातखिळी बसणे
- ऐकायला कमी येण्याची तक्रार
- वारंवार कान फुटणे
- अचानक बोलता न येणे
- गिळताना त्रास होणे

## व्ही. सी. टी. सी.

- सर्व एच. आय. व्ही. पॉझीटिव्ह रुग्ण
- स्त्रियांशी संबंधित इतर आजार

## शस्त्रक्रिया संबंधित लक्षणे

- कोणत्याही प्रकारे मारहाण किंवा हल्ल्याची तक्रार
- पोटात इजा होणे
- भाजल्याची/जळल्याची लक्षणे
- अंतर्गत इजा, मार किंवा खरचटल्याच्या खुणा घेऊन येणाऱ्या स्त्रिया

## दात संबंधित लक्षणे

जबडा तुटणे
दात तुटणे


UNFPA
संयुक्त राष्ट्र जनसंख्या कोष
सार्वजनिक आरोग्य विभाग
NHM
राष्ट्रीय आरोग्य अभियान महाराष्ट्र
Cehat